महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग,मुंबई. ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२
Website:-www.doa.maharashtra.gov.in Email:-dirdoa.mum-mah@gov.in/directorateofart@gmail.com

दिनांक:- २७ जूलै, २०२३

# प्रसिध्दीपत्रक

## शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता प्रथम वर्ष प्रमाणपत्र/पदविका अभ्यासक्रम प्रवेशासाठीचे सुधारित वेळापत्रक

---------

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता १ वर्ष, २ वर्षे व ४ वर्षे कालावधीच्या पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम शासकीय, शासनमान्य् अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला संस्थाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने या संचालनालयाचे दि.१९ जूलै, २०२३ रोजीचे प्रसिध्दपत्रकान्वये "संबंधित महाविद्यालयात प्रवेश घेण्याचा दिनांक २४/०७/२०२३ ते दिनांक २८/०७/२०२३" अशा नियोजित तारखा कळविण्यात आल्या आहेत. तथापि, भारतीय हवामान खाते यांनी महाराष्ट्र राज्यासह मुंबई महानगराला दि.२७.०७.२०२३ रोजी अतिमुसळधार पावसाचा (रेड अलर्ट) इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता, संबंधित महाविद्यालयात प्रत्यक्ष प्रवेश घेण्यास मुदतवाढ देण्यात येत असून सुधारित तारखा पुढील प्रमाणे असतील **"संबंधित महाविद्यालयात प्रवेश घेण्याचा दिनांक २४/०७/२०२३ ते दिनांक ०४/०८/२०२३."**

तसेच या संचालनालयाचे पत्र क्र.डिओअे-२०२३/दोन/१९८३, दि.२१ जूलै, २०२३ मधील मुद्दा क्र.१५ नुसार ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्यानंतरही जागा रिक्त राहिल्यास सदर जागांसाठी दि.३१.०७.२०२३ ते १८.०८.२०२३ पर्यंत संस्था स्तरावर प्रवेश देण्यात यावेत, असे कळविले आहे. सदर तारखांमध्ये बदल करण्यात येत असून **ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्यानंतरही जागा रिक्त राहिल्यास सदर जागांसाठी दि.०७.०८.२०२३ ते १८.०८.२०२३ पर्यंत संस्था स्तरावर प्रवेश देण्यात यावेत.**

(टिप:-वरील वेळापत्रकात बदल झाल्यास त्याबाबत http://doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर किंवा http://doaonline.co.in/fineart23/ या लिंकवर घोषित करण्यात येईल.)

सही/-
(संदीप डोंगरे)
प्र. निरीक्षक, चित्रकला व शिल्प,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सही/-
(राजीव मिश्रा)
कला संचालक, कला संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई